# मेट्रो-३ प्रकल्पातील २५ वे ब्रेक थ्रू पूर्ण

**मुंबई (प्रतिनिधी) :**

मुंबईतील वाहतूक व्यवस्था आंतरराष्ट्रीय दर्जाची करण्याच्या तसेच वाहतूक कोंडी दूर करण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या अशा मेट्रो-३ प्रकल्पातील एक महत्त्वाचा टप्पा बुधवारी पूर्ण करण्यात आला आहे. मेट्रो-३ मधील २५ वे ब्रेक थ्रू यशस्वी झाले आहे. भुयारीकरणाचे काम पूर्ण करत आणखी एक टनल बोअरिंग मशीन (टीबीएम) बाहेर पडले आहे. या २५ व्या ब्रेक थ्रूमुळे आता भुयारीकरणाचे ७८ टक्के काम पूर्ण झाल्याचे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन (एमएमआरसी)ने सांगितले आहे.

कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो-३ ही ३३.५ किमी संपूर्णतः भुयारी मेट्रोचे काम एमएमआरसीकडून वेगात सुरू आहे. मुंबईसारख्या बेटावर वसलेल्या, गर्दीच्या, जुन्या इमारतींची संख्या अधिक असलेल्या आणि जमिनीखाली विविध प्रकारच्या वाहिन्या असलेल्या ठिकाणी भुयारीकरणाचे काम करणे मोठे आव्हान एमएमआरसीसमोर होते. हे आव्हान पेलण्यासाठी अत्याधुनिक अशा टीबीएम तंत्रज्ञानाचा वापर एमएमआरसीने केला आहे. त्यानुसार भल्या मोठ्या अंदाजे ४०० टनाच्या



## आतापर्यंत ७८% भुयारीकरण

१७ टीबीएम मशीन मुंबईत आणण्यात आल्या असून या टीबीएम मशीन दोन वर्षांपूर्वी मुंबईच्या पोटात सोडण्यात आल्या आहेत. या टीबीएम भुयारीकरणाचे काम पूर्ण करत एक-एक करून पोटातून बाहेर पडत आहेत. त्यानुसार बुधवारी वरळी सायन्स सेंटरपासून दूरदर्शनपर्यंतचे भुयारीकरणाचे काम पूर्ण करत तानसा-१ हे टीबीएम मशीन दुपारी साडेबाराच्या सुमारास बाहेर आले. त्यानंतर उपस्थितांनी एकच जल्लोष केला. तानसा-१ने २.०७ किमीचे भुयारीकरण पूर्ण केले असून यासाठी १३८१ सेगमेन्ट रिंग्सचा वापर करण्यात आला आहे. जवळपास ६० ते ७० मीटर खोल हे भुयारीकरणाचे काम सुरू होते. या भुयारीकरणाच्या आनुषंगाने आता ७८ टक्के भुयारीकरणाचे, तर ५० टक्के बांधकाम पूर्ण झाले आहे. त्यामुळे हा प्रकल्प वेगाने पुढे जात असून प्रकल्प निश्चित वेळेत पूर्ण होईल, असा विश्वास एमएमआरसीचे व्यवस्थापकीय संचालक रणजीत सिंह देओल यांनी व्यक्त केला आहे.